

सेवानिवृत्त होणा-या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक २८/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 55 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# मावळ तालुक्यातील आरोग्यकेंद्रांची कामे तातडीने मार्गी लावा - उपमुख्यमंत्री पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील लोणावळा व वडगाव (कान्हे) उपजिल्हा रुग्णालयांची कामे गतीने पूर्ण करावी. मौजे जांभूळ येथील क्रीडा संकूल सर्व सुविधायुक्त, मावळ तालुक्याचा गौरव वाढवणारे असावे, देहू नगरपंचायतीसह, खडकाळे, वराळे, डोणे आढळे, डोंगरगाव कुसगाव, पाटण, कार्ला व परिसरातील पाणीपुरवठा योजना गतीने पूर्ण कराव्यात. मौजे कार्ला येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासह श्रीएकवीरा मंदिर परिसराच्या विकासाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

लोणावळ्यातील पर्यटकांची आणि कार्ला येथील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन दोन्ही ठिकाणी सुरक्षेच्याद्दष्टीने पर्यटन पोलिस ठाणी स्थापन करण्यात येतील. महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तळेगाव, चाकण, शिक्रापूर परिसरातल्या महामार्गाचे रुंदीकरण, महामार्गावर उड्डाणपूल उभारण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून केंद्रीय रस्तेवाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल, यासाठी मी स्वत: पुढाकार घेईन, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बैठकीत स्पष्ट केले.पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील विकासप्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करुन या प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर (व्हीसीद्वारे), स्थानिक आमदार सुनील शेळके यांच्यासह नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, वित्त व नियोजन, पाणीपुरवठा- स्वच्छता, आरोग्य, एमएसआरडीसी, एमएसआयडीसी, गृह, क्रीडा आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पुण्याचे जिल्हाधिकारी, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामीण पोलीसचे वरिष्ठ अधिकारी (व्हीसीद्वारे) उपस्थित होते.

# राज्यपालांनी घेतला वनहक्क कायदाचा आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



वनहक्क कायद्याची कालबद्धपणे अंमलबजावणी करण्यासाठी वैयक्तिक व सामूहिक वन हक्कांचे प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्यात यावेत. तसेच वन हक्क लाभार्थींचे आधारकार्ड जोडणी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत नोंदणी आदी कामेही विशेष शिबिर घेऊन पूर्ण करण्याचे निर्देश राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दिले.राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील सहा विभागीय आयुक्त तसेच शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुंबईतील राजभवन येथे बैठक घेऊन वनहक्क कायदा, २००६ च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. बैठकीला आदिवासी विभागाचे सचिव डॉ. विजय वाघमारे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिन्द्र शेळके, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी (कोकण), चंद्रकांत पुलकुंडवार (पुणे), डॉ. प्रवीण गेडाम (नाशिकसर्व विभागीय आयुक्तांनी वनहक्क दाव्यांची प्रलंबितता दूर करण्यासाठी स्वतः लक्ष घालून कामे करावीत. तसेच यासंदर्भातील प्रगतीचा अहवाल दर पंधरा दिवसांनी राजभवनला देण्यात यावा. हे दावे निकाली काढण्यासाठी तसेच आदिवासी नागरिकांचे आधार कार्ड काढणे, वैयक्तिक वन हक्क धारक शेतकऱ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत समावेश करणे आदींसाठी आदिवासी भागात विशेष शिबिर घेण्यात यावे. तसेच वन हक्क दाव्यांचे डिजिटायझेशन व स्कॅनिंगची कामे पूर्ण करावीत. वन हक्क दाव्यांच्या प्रकरणांसाठी ऑनलाईन पोर्टलचा वापर करावा. वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात केलेल्या कार्यवाही अहवाल दर पंधरा दिवसांनी सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.क), दिलीप गावडे (छत्रपती संभाजीनगर), श्वेता सिंघल (अमरावती) व डॉ. माधवी खोडे चावरे (नागपूर) तसेच इतर वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक २८/02/२०२५

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पिंपरी चिंचवड शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर

## महापालिका प्रशासनाला राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा जाब!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील दीड महिन्यापासून महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताचे काम पूर्णपणे थांबवले आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांत कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून, अनेक ठिकाणी नागरिकांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. या परिस्थितीचा आढावा घेत राष्ट्रवादी युवक काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्षाचे युवक पदाधिकारी श्री. मंगेश असवले यांनी प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना पत्र देऊन जाब विचारला आणि तातडीने कारवाईची मागणी केली.महापालिकेच्या निष्क्रियतेमुळे नागरिक त्रस्त शहरातील भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे लहान मुले, महिला, वृद्ध आणि दुचाकीस्वार मोठ्या प्रमाणात बाधित होत आहेत. काही ठिकाणी गंभीर जखमा होण्याच्या घटना



घडल्या असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय, कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने रेबीज आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत आहे. महापालिकेने वेळोवेळी कुत्र्यांच्या धरपकडीसाठी आणि नसबंदी मोहिमेवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला असल्याचे सांगितले जाते, परंतु प्रत्यक्षात नागरिकांना त्याचा काहीही फायदा होत नाही. उलट, समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महापालिकेला ठरवलेल्या मागण्या:

शहरभर भटक्या कुत्र्यांची तातडीने धरपकड सुरू करावी. नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष टास्क फोर्स तयार करावा. नियमित लसीकरण व नसबंदी मोहिम सुरू करावी. शहरातील प्रमुख भागांमध्ये कुत्र्यांसाठी स्वतंत्र निवासस्थाने व फीडिंग झोन तयार करावेत. नागरिकांच्या तक्रारींसाठी २४ तास कार्यरत हेल्पलाईन सुरू करावी. युवक पदाधिकारी मंगेश असवले यांनी महापालिकेला जर ठोस कारवाई नाही झाली, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे "महापालिकेने शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. केवळ आश्वासनांवर वेळ न दवडता तातडीने ठोस कारवाई करावी. अन्यथा, आम्ही रस्त्यावर उतरून प्रशासनाला जाग आणू..!"

– मंगेश असवले, युवक पदाधिकारी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्ष.

# सेवानिवृत्त होणा-या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सेवानिवृत्त होणा-या अधिकारी,कर्मचा-यांनी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणाने आणि जबाबदारीने केलेल्या कार्यालयीन कामकाजामुळे महापालिकेचे काम उत्तम पध्दतीने पार पडले आहे या त्यांच्या कामाचा आदर्श महापालिकेत सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी घ्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे माहे फेब्रुवारी २०२५ अखेर नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या ११ आणि स्वेच्छानिवृत्ती होणाऱ्या २ अशा एकुण १३ कर्मचा-यांचा आज अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन देताना ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रूण दगडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी सुरेंद्र देशमुखे, चारूशीला जोशी, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया जाधव, तसेच कर्मचारी महासंघ प्रतिनिधी बालाजी अय्यंगार,शेखर गावडे,नंदकुमार इंदलकर,उमेश बांदल आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक,विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये क्ष किरण शास्त्रज्ञ रसिका वाघमारे, लेखाधिकारी अनिल पासलकर, मुख्य लिपीक मंगल म्हस्के, बायोमेडिकल इंजिनिअर सुनिल लोंढे, लाईव्ह स्टॉक सुपरवायझर सुनिल सातपुते, मुख्याध्यापक मंदाकिनी घोरपडे, रविंद्र शिंदे, शाहिदा शेख, क्रीडा शिक्षक लक्ष्मण माने, उपशिक्षिका लिला कोल्हे, रखवालदार प्रदीप गव्हाणे आदींचा समावेश आहे तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगार शंकरलाल चा॑वरिया, मधुकर सोनावणे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले. तर सुत्रसंचालन आणि आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक २८/02/२०२५

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# प्रत्येक बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा परीक्षण करा

## मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई, दि. २७ : राज्यातील सर्वच बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा परीक्षण (security audit) करण्यात यावे. तसेच बसस्थानक व आगारांमध्ये असलेल्या निर्लेखित बसेस व परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांचे १५ एप्रिलपर्यंत निष्कासन करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या. बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठक अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या दालनात झाली. बैठकीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव व एसटी महामंडळाचे अध्यक्ष संजय सेठी, परिवहन आयुक्त व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय (प्रभारी) विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, एस टी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.बसस्थानक परिसरातील निर्लेखित बसेस निष्कासनासाठी विहित कालावधी निश्चित करुन १५ एप्रिलपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. राज्य परिवहन महामंडळाकडे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी पद असून या रिक्त पदावर भारतीय पोलीस सेवेतील (IPS) अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. याबाबत प्रस्ताव गृह विभागाला विनाविलंब सादर करण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यभरात सर्वच एसटी बसस्थानके व आगारांमध्ये सीसीटीव्हीची 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत यंत्रणा उभारण्यात यावी. नवीन बसेसमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात यावे. बसेसमध्ये 'जीपीएस' यंत्रणा बसविण्याचे काम गतीने पूर्ण करण्यात यावे. पोलिसांची मदतीने बसस्थानकात गस्त वाढवण्यात यावी, आगार व्यवस्थापक हे त्या आगाराचे पालक असल्यामुळे त्यांनी तेथील निवासस्थानामध्येच वास्तव्य करावे. जेणेकरून २४ तास त्यांच्या निरीक्षणाखाली आगाराचे व्यवस्थापन चालेल. याबरोबरच बसस्थानकावर काम करणाऱ्या प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याला ओळखपत्र देण्यात यावे, जेणेकरून कर्मचारी असल्याचे भासवून प्रवाशांना कोणी लुबाडणार नाही.

# चाकूचा धाक दाखवून लुटणारे पोलिसांच्या जाळ्यात



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि मोबाईल हिसकावणाऱ्या दोघांना खंडणी विरोधी पथक आणि गुन्हे शाखा तीनने बेड्या ठोकल्या आहेत.

२१ आणि २२ फेब्रुवारी रोजी चऱ्होली परिसरातील प्राइड वर्ल्ड सिटी या ठिकाणी मॉर्निंग वॉक करणाऱ्या आठ नागरिकांना चाकूचा धाक दाखवून मौल्यवान वस्तू आणि मोबाईल घेऊन चोरटे पसार झाले होते.

याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. विश्वजीत अर्जुन पवार आणि यव्हान भास्कर कासार अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.२१ आणि २२ फेब्रुवारी रोजी आळंदी, पुणे शहरात आणि ग्रामीण भागात मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावणे तसेच त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू घेतल्याची घटना घडली होती.

दोन दिवसांमध्ये एकूण १४ घटना घडल्याने पोलिसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. याबाबत दिघी आणि आळंदी पोलीस ठाण्यात सोनसाखळी हिसकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखा युनिट तीनचे अधिकारी आणि खंडणी विरोधी पथक त्याचबरोबर आळंदी आणि दिघी पोलीस ठाणे हे समांतर तपास करत होते.

सीसीटीव्हीच्या आधारे आरोपी यव्हान भास्कर कासार आणि विश्वजीत अर्जुन पवार यांच्यापर्यंत पोलीस पोहोचले. दोघांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



# उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे मराठी राजभाषा दिन साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

ता.२७ , पिंपळे सौदागर (प्रतिनिधी) : पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक कामांसाठी प्रसिद्ध असलेल्या , उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पिंगळे सौदागर आणि रहाटणी मधील वाचनप्रेमी नागरिकांनी या पुस्तक वाटपाचा लाभ घेतला.या उपक्रमामागील संकल्पना विशद करताना , उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक श्री.संजय भिसे म्हणाले , "मराठी वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी फाऊंडेशन नेहमीच कटीबद्ध आहे त्याचाच एक भाग म्हणून 5000 हून अधिक पुस्तकांचा संग्रह असलेले विठाई वाचनालय उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे मोफत चालवले जाते. आज , मराठी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने कवी कुसुमाग्रजांचे स्मरण करताना , याच वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी आम्ही अग्रनामांकित मराठी साहित्य वाचक प्रेमींमध्ये वाटप आहोत." यानिमित्ताने ,



श्री.सखाराम ढाकणे म्हणाले , "मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर आपली संस्कृती, आपली परंपरा आणि आपली ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते लोकमान्य टिळक, बाबासाहेब पुरंदरे, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान व्यक्तींनी मराठीच्या माध्यमातून समाजाला दिशा दिली. आजच्या डिजिटल युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असताना, आपण मराठीचा अभिमान बाळगला पाहिजे.

मराठीतून विचार मांडणे, लेखन करणे आणि तिचा प्रचार व प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे." याप्रसंगी , डॉ सुभाषचंद्र पवार, श्री रमेश वाणी, श्री सखाराम ढाकणे अनिल कुलकर्णी, बाळकृष्ण चौधरी , रमेश चांडगे, रमेश जावळे, प्रा शिवाजी पाटील यांच्यासह विठाई वाचनालय चे सभासद , आनंद हास्य क्लबचे सभासद , ऑल सिनियर सिटीजन्स असोसिएशन चे सर्व सभासद तरुण वर्ग आणि पिंपळे सौदागर ग्रामस्थ आणि परिसरातील साहित्य प्रेमी नागरिक बंधू-भगिनी आदी उपस्थित होते.

# स्व.आ.लक्ष्मण जगताप यांच्या जयंतीनिमित्त अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिर

## नवी सांगवी येथे २८ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान आयोजन

पिंपरी-चिंचवड : लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६२व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि अटल चॅरिटेबल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 28 फेब्रुवारी ते एक मार्च दरम्यान नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. महा शिबिराचे मुख्य संयोजक व पिंपरी-चिंचवड भाजपचे अध्यक्ष आमदार शंकर जगताप यांनी ही माहिती दिली.

**शिबिरामध्ये उपलब्ध असणाऱ्या मोफत सेवा :** - मोफत कॅन्सर तपासणी - मोफत X-रे - मोफत सोनोग्राफी- मोफत सर्व रक्त तपासण्या - मोफत डायलिसीस आणि उपचार - दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव व आवश्यक उपकरणे

**विशेष तपासण्या व शस्त्रक्रिया :** शिबिरात विविध आजारांवरील तपासणी आणि उपचार मोफत करण्यात येणार आहेत, त्यामध्ये




प्रामुख्याने खालील शस्त्रक्रिया व उपचार समाविष्ट आहेत : - हृदय रोग: शस्त्रक्रिया व प्रत्यारोपण - किडनी विकार: किडनी प्रत्यारोपण - लिव्हर व कॅन्सर उपचार: लिव्हर प्रत्यारोपण, कॅन्सर शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन - हाडांचे विकार: गुडघे प्रत्यारोपण, हिप प्रत्यारोपण, मणक्यांचे आजार - नेत्ररोग: मोफत चष्मे वाटप, डोळ्यांवरील शस्त्रक्रिया - बालरोग व स्त्रीरोग: लहान बालकांच्या हृदयातील छिद्राची शस्त्रक्रिया, किशोरवयीन मुलींचे समुपदेशन, गरोदर माता तपासणी - दिव्यांगांसाठी सहाय्य: अत्याधुनिक कृत्रिम हात व पाय तसेच कॅलीपर्सचे मोफत वाटप - आयुर्वेदिक उपचार: न्युरोथेरेपी, योगा, युनानी, सिद्धा, होमिओपॅथी, नॅचरोथेरपी

**शिबिरात सहभागी होणारी प्रमुख रुग्णालये :** या आरोग्य शिबिरात अनेक नामांकित रुग्णालये सहभागी होणार आहेत, त्यामध्ये प्रमुख आहेत : - ससून हॉस्पिटल, जिल्हा रुग्णालय, औंध - टाटा मेमोरिअल हॉस्पिटल (मुंबई) - आदित्य बिर्ला हॉस्पिटल, जहांगीर हॉस्पिटल, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल - डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, लोकमान्य हॉस्पिटल (चिंचवड) - एम्स हॉस्पिटल, पुणे हॉस्पिटल, सिल्व्हर बर्च मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल - भारती हॉस्पिटल, रुबी हॉस्पिटल, आयसीटीआरसी वाघोली, वेदांत सेंट्रल हॉस्पिटल (मुंबई) शिबिराचे ठिकाण आणि वेळ : - स्थळ: पी.डब्ल्यू.डी. मैदान, नवी सांगवी, पिंपरी चिंचवड, पुणे - २७ - तारीख व वेळ: २८ फेब्रुवारी २०२५ आणि ०१ मार्च २०२५, सकाळी ०९:०० ते संध्याकाळी ०६:०० नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे : - ओळखपत्र (आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा रेशन कार्ड) - पूर्वीचे वैद्यकीय अहवाल (असल्यास) नोंदणी आणि संपर्क: ऑनलाईन नावनोंदणीसाठी [www.spjfoundation.com](http://www.spjfoundation.com ) ला भेट द्या किंवा खालील क्रमांकावर संपर्क साधा : ८७६७८५७६११, ७५७५९८११११ आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा मानून नागरिकांनी मोठ्या संख्येने या अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

८७६७८५७६११, ७५७५९८११११ आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा मानून नागरिकांनी मोठ्या संख्येने या अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



आजचा काळ आधुनिक तंत्रज्ञानाचा आहे. यात अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध असून मराठी भाषा संस्कृती जोपासणारी ज्ञानभाषा आहे. या भाषेला व्यावहारिक भाषेसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास युवा शक्तीला रोजगाराच्या अनेक संधीचे दालन खुले होऊन त्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे राहणे सहज शक्य होईल, असे प्रतिपादन आमदार अमित गोरखे यांनी केले.

वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरवदिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात मराठी भाषेची संस्कृती जागवणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

याप्रसंगी माजी नगरसदस्या अनुराधा गोरखे, अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त विठ्ठल जोशी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, औद्योगिक प्रशिक्षण संस्था कासारवाडीचे प्राचार्य ज्योत सोनवणे, मराठी भाषा समन्वय अधिकारी तथा विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कार्यालयीन अधिक्षक उमा दरवेश तसेच मोरवाडी आणि कासारवाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे गटनिदेशक, शिक्षक आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

यावेळी अमित गोरखे म्हणाले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी मराठी भाषेसाठी दिलेले योगदान महत्वपुर्ण आहे. अनेक साहित्यिक लेखकांनी मराठी भाषेचा दर्जा उंचावला. त्यातून महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यात यशस्वी होऊन देशात अग्रभागी राहिला आहे. शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संधीचे दार खुले करून दिले आहे. शासकीय कार्यालयात मराठीचा वापर केला जात आहे. या भाषेचा प्रचार प्रसार करण्यासाठी महापालिकेने सातत्याने पुढाकार घ्यायला हवा.

पिंपरी चिंचवड महापालिकेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व वाखाण्याजोगे आहे. मराठीवर प्रेम करणारी मंडळी भरपूर आहेत, पण मराठीवर प्रभुत्व मिळवणेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी मराठी साहित्यिकांविषयी, मराठी साहित्याविषयी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी जिज्ञासा वृत्ती ठेवून मराठी भाषा समजून घ्या, पुस्तक वाचा, मोबाईलचा उपयोग मराठीचे ज्ञान मिळवण्यासाठी करा, असा सल्लाही आमदार गोरखे यांनी याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. तर, प्रत्येकाने मराठी भाषेचा आग्रह ठेऊन मराठी भाषेत संभाषण केले पाहिजे असे माजी नगरसदस्या अनुराधा गोरखे म्हणाल्या.

अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले, 'मराठी भाषा संत-साहित्यिकांनी समृद्ध आणि विकसित केली आहे. आपल्याला हाच वारसा पुढे घेऊन जाण्याची मोठी जबाबदारी आहे. कारण प्रत्येकाला अभिमान वाटेल, अशी आपली मराठी भाषा आहे. मराठीचा प्रचार-प्रसार होण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन करीत असते.

उप आयुक्त विठ्ठल जोशी यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व सांगतानाच कवी कुसुमाग्रज यांचे साहित्य मराठी भाषेसाठी मोठा ठेवा असल्याचे विशद केले. जोपर्यंत मराठी माणुस आहे, तोपर्यंत मराठी भाषेचे अस्तित्व टिकून राहणार आहे. मराठी भाषा समृद्ध झाली असून तिचे भवितव्य उज्वल आहे, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची भूमिका विशद केली. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी कशा पद्धतीने काम करीत आहे, याबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाची सुरूवात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकांच्या महाराष्ट्र दर्शन या गायनाच्या कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमात शिक्षकांनी कानडा राजा पंढरीचा.., जीवा शिवाची बैल जोड.., मी हाय कोळी.., अशी मालवणी, खान्देशी, वऱ्हाडी, कोकणी भाषेवर आधारित गीते सादर केली. यानंतर सुलेखनकार शरद कुंजीर यांनी आपल्या शब्दांना भाव देणाऱ्या कलेने म्हणजेच सुलेखनाने सर्वांना मोहून टाकले. त्यांनी यावेळी आपल्या कुंचल्यांच्या सहाय्याने कवी कुसुमाग्रज यांचे अतिशय सुंदर असे चित्र रेखाटले. तसेच मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या शब्दांच्या रचना देखील कागदावर उतरवल्या. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी या कलेच्या प्रात्याक्षिकामध्ये सहभाग घेतला. व्याख्याते डॉ. शिवप्रसाद महाले यांनी युवा शक्तीची स्वर्णिम भारताकडे वाटचाल या विषयावरील आपल्या प्रेरणादायी व्याख्यानाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, भारत देशातील युवांमध्ये खुप शक्ती आहे. अनेकांनी बुद्धीमत्तेच्या जोरावर आज जगाच्या पाठीवर एक वेगळा ठसा उमटविला आहे. पण आज या देशातील बरीचशी पिढी सोशल मिडीयाच्या जाळ्यात अडकली आहे. या पिढीला सोशल मिडीयाचा योग्य वापर कसा करावा हे अजून उमगलेले नाही. युवा पिढीने सोशल मिडीयाच्या आहारी न जाता त्याचा वापर आपले दैनंदिन जीवन सोयीस्कर करण्यासाठी कसा करता येईल याकडे लक्ष द्यायला हवे. तुम्ही कोणत्या सानिध्यात राहता हे खुप महत्वाचे आहे. तुमच्या आजूबाजूच्या वातावरणाचा तुमच्या जीवनशैलीवर परिणाम होत असतो. त्यावर तुमचा प्रतिसाद ठरलेला असून त्याप्रमाणे परिणाम अपेक्षित असतो. त्यामुळे आपल्याला स्वतःच्या विचारसरणीवर काम करावे लागेल. बुद्धिला चालना देऊन बाह्यसौंदर्यापेक्षा आंतरिक शक्तीवर आपण लक्ष द्यायला हवे, असेही ते यावेळी म्हणाले.

त्यानंतर राष्ट्रीय भारूडकार हमीद अमीन सय्यद यांच्या भारूडाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी त्यांनी आपल्या पारंपारिक लोककलेच्या अविष्काराने उपस्थितांना मंत्रमुग्ध करून टाकले. त्यांनी यावेळी संत सेना महाराज यांचे वारिक वारिक वारिक करू हजामत बारीक, संत एकनाथ महाराज यांचे नवरा नको गं बाई, मला दादला नको बाई तसेच गुरगुंडा होईल बया गं... अशा विविध विषयांवर भारूडे सादर करून प्रबोधन केले.

यावेळी ज्ञानेश्वरी ढगे या बालकिर्तनकाराने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहास सांगणारे प्रवचन सादर केले. तसेच प्रतिज्ञा रूमडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले तर आभार औद्योगिक प्रशिक्षण मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील यांनी मानले. तसेच सुत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि पौर्णिमा भोर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कासारवाडी तसेच मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील गटनिदेशक प्रकाश घोडके, शर्मिला कारावळे, मनोज ढेरंगे, किसन खरात, कार्यालयीन अधिक्षक उमा दरवेश, मुख्य लिपीक विजय भैलुमे, प्रविण शेलार, मयुरी वाडेकर यांचे सहकार्य लाभले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968